# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.06.2025** **वार- शुक्रवार**

---

**शिव राज्याभिषेक**

आज पुणे शहरासह जिल्ह्यात ठीकठिकाणी 352 वा राज्याभिषेक सोहळा विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. विविध गड-किल्ल्यांवरदेखील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं होतं. ठीकठिकाणी शिवप्रेमीकडून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आलं.

**कॉ.अजितअभ्यंकर**

आपली मराठी भाषा, संस्कृती संपवली जात असताना आपण गप्प न बसता बंधुतेच्या तत्वाने त्याचा विरोध करून मराठी भाषेला अधिक समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत असं प्रतिपादन ज्येष्ठ कामगार नेते कॉ. अजित अभ्यंकर यांनी केलं आहे. ते आज पुण्यात 'विश्वबंधुता भूषण पुरस्कार' सोहळ्यात बोलत होते. विश्वबंधुता साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वबंधुता दिनाच्या निमित्ताने आयोजित सातव्या बंधुता काव्यमहोत्सवाच्या समारोपावेळी कॉ. अजित अभ्यंकर आणि प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांना 'विश्वबंधुता भूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आलं. बंधुताचार्य प्रकाश रोकडे, मंदाकिनी रोकडे, स्वागताध्यक्ष भारती जाधव आदी उपस्थित होते.

**<u>ईद</u>**

चंद्रदर्शन झाल्यामुळे उद्या म्हणजेच शनिवारी ईद उल अजहा अर्थात बकरी ईद साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्ताने पुण्यातील ईदगाह मैदानासह विविध मशिदींमध्ये सामुहिक नमाज अदा करण्यात येणार आहे. या निमित्ताने मुस्लिम धर्मिय नागरिकांना सीरत कमिटीतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. दरम्यान या पार्श्वभूमीवर गोळीबार मैदान परिसरातील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले असून वाहन चालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करण्याचं आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

**<u>गंगवाल</u>**

धर्माच्या नावाखाली होणारी पशुहत्या रोखण्यासाठी केंद्र सरकारने कठोर कायदा करून त्याची कडक अंमलबजावणी करण्याची मागणी सर्वजीव मंगल प्रतिष्ठानाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. कल्याण गंगवाल यांनी पुण्यात  पत्रकार परिषदेत केली.  ‘बकरी ईद अहिंसक आणि पर्यावरणपूरक व्हावी. त्यामुळे बकरी ईदच्या नावाखाली प्राण्यांचा बळी न देता  पिठाची प्रतीकात्मक बकरी किंवा बकरीच्या प्रतिमेचा उपयोग करून ही ईद साजरी करावी. कोणत्याही प्राण्याचा जीव घेण्याचा कोणालाही अधिकार नसून धर्माच्या नावाखाली देवी-देवतांसमोर कोणताही पशुबळी देऊ नये असंही गंगवाल यावेळी म्हणाले.

**<u>धरणसाठावाढ</u>**

पुणे जिल्ह्यातील नीरा देवघर, भाटघर, वीर, नाझरे आणि उजनी धरणांमधील पाणीसाठ्यात मे २०२५ मधील अतिवृष्टीमुळे मागील वर्षीच्या जूनच्या पहिल्या आठवड्याच्या तुलनेत वाढ झाली आहे. जून २०२५ मध्ये धरणांमधील पाणीसाठ्यात सरासरी पाच ते ७५ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. उजनी धरणात मात्र जूनच्या पहिल्या आठवड्यात यंदा १५ पूर्णांक ३९ टक्क्यांपर्यंत साठा उपलब्ध आहे. जलसंपदा विभागाच्या अहवालानुसार सध्या वीर धरणाच्या उजव्या कालव्यातून ७०२ क्युसेकने विसर्ग सुरू आहे.

**सांडपाण्यातकोरोना**

पुणे शहरातील सांडपाण्यात मे महिन्यात कोरोना विषाणूचे अंश आढळून येत असल्याचं राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या तपासणीतून पुढं आलं आहे. शहरातील एका सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील पाण्यात एप्रिलच्या अखेरीस करोना विषाणूचे अंश आढळून आले होते. नंतर मे महिन्यापासून सर्वच सांडपाणी प्रकल्पांतील पाण्यात हे अंश आढळून येत आहेत. तपासणी करण्यात आलेल्या शहरातील १० सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांतील सांडपाण्यात कोरोना विषाणूचे अंश आढळून येत आहेत. याबाबतची माहिती महापालिकेसह राज्याच्या आरोग्य विभागाला देण्यात आली असल्याचं राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेकडून सांगण्यात आलं आहे.

**सुरक्षा**

महिला सुरक्षेसाठी पुणे पोलीसांनी पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बसमध्ये विशेष पोलिस पथक नैनात करण्यात आलं आहे. यामध्ये दोन पोलिस निरीक्षक एक उप निरीक्षक तर २२ पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. हे पथक मुख्य बस मार्ग आणि थांब्यांवर असणार आहे. बसमध्ये महिलांची छेडछाड, चोरी अशा तक्रारी आल्याने हे पथक तैनात करण्यात आलं आहे.

**वारीएसटी**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाने आषाढी वारीकरिता पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी १४ आगारातून ७५० बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात येत आहे. पुणे विभागाच्या ३५० तर इतर चारशे बसेस या मुंबई आणि विदर्भ विभागातून मागविण्यात आल्या आहेत.

**नालेसफाई**

पुणे शहराच्या विविध भागातील नालेसफाईची  ८१ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. त्यात महापालिकेत समाविष्ट २३ गावांमध्ये नालेसफाईची ७३ टक्के कामे झाली आहेत. पावसाळी गटारांच्या साफसफाईची ७१ टक्के कामे पूर्ण झालेली आहेत.

**<u>पाणीपुरवठा</u>**

पुण्यातील वारजे जलशुद्धीकरण केंद्र अंतर्गत अखत्यारीतील चांदणी चौक टाकी परिसर , पॅनकार्ड क्लब GSR टाकी परिसर आणि भामा आसखेड जलशुद्धीकरण प्रकल्पामधून पाणीपुरवठा गुरुवारी म्हणजेच येत्या 12 जून रोजी विविध कामांसाठी पाणीपुरवठा बंद राहणार आहे. शुक्रवारी १३ जून रोजी सकाळी कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परसिरात आज माध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. तर कमाल तापमान 33 तर किमान तापमान 23 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही याच स्वरूपाचे हवामान राहण्याची शक्यता असून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**